राज्य महिला तक्रार निवारण समितीने व संबंधित विभागाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणूकी संदर्भातील प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक - मकक-२००७/प्र.क्र.०७/मकक,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २६ डिसेंबर, २००७.

वाचा : १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९९/७३/मकअ, दि.१९.५.१९९९.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१००३/३६/प्र.क्र.६/मकअ,दि.५.१.२००४.
३. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मकवी-२००६/प्र.क्र.१५/मकक, दि.१९.९.२००६.

**शासन परिपत्रक :** कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ च्या रिट विनंती अर्जामध्ये (सीआरएल क्र.६६६-७०/९२) दिनांक १३ ऑगस्ट, १९९७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय **विशाखा जजमेंट** या नांवाने सुपरिचित आहे. त्यातील दिलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने दिनांक १९.५.१९९९ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील महिलांसाठी राज्यस्तरीय महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. या गठीत करण्यात आलेल्या समितीचे कामकाज वरील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने करण्यात येते. याबाबत विभाग प्रमुखाने करावयाची कार्यवाही त्याचप्रमाणे सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्या गठीत करण्याबाबतची कार्यवाही करण्याच्या संदर्भात दिनांक १९.९.२००६ रोजी सर्व समावेशक आदेश निर्गमित करण्यात आला आहे व त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्यांच्या लैंगिकदृष्टया अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. वाचा येथील अनु.क्र.२ मधील शासन निर्णयानुसार चौकशी कशात-हेने करण्यात यावी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. तथापि, त्यामध्ये चौकशी करण्याबाबतचा कालावधी प्रत्येक स्तरावर नमूद केलेला नाही. तसेच मंत्रालयीन विभागात व त्यांच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये गठीत झालेल्या महिला तक्रार निवारण समित्यांमध्ये तक्रारीची प्रकरणे कशात-हेने हाताळण्यात यावीत याबाबत स्पष्ट आदेश नसल्यामुळे सदर कार्यपध्दतीची रुपरेषा ठरविण्याबाबत आवश्यकता निर्माण झालेली आहे.

२. राज्य महिला तक्रार निवारण समितीच्या बैठकीत संबंधित विभागाचे सचिव तसेच वरिष्ठ पातळीवरील अधिका-यांना बोलाविण्यात येऊन त्या तक्रारीत नमूद केलेल्या अधिका-यांविरुध्द कोणती

कार्यवाही केली आहे. याचा आढावा घेण्यात येतो व विभाग प्रमुखांमार्फत दोषी अधिकारी / कर्मचा-यांवर समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करण्यात येते.

३. शासनाने वेळोवळी याबाबत वर नमूद केल्याप्रमाणे सूचना निर्गमित केल्या आहेत आणि सदर चौकशी ही पिडीत महिलेस न्याय देण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळाच्या तक्रारीच्या संदर्भात जलद गतीने प्रकरणे निकाली काढण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे विभाग प्रमुखांना तसेच त्यांच्या अधिनस्त असलेली शासकीय/निमशासकीय कार्यालये / महामंडळे यांना तसेच राज्य महिला तक्रार निवारण समितीला कालमर्यादा ठरवून देण्यात येत आहे.

५. पिडीत महिलेने ती कार्यरत असलेल्या ठिकाणी गठीत करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समितीकडे / विभाग प्रमुखाकडे अथवा राज्य महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रार देणे आवश्यक आहे.

६. राज्य महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखाकडे ८ दिवसांच्या आंत पाठविण्यात यावी.

७. संबंधित विभागाने तक्रारदार ज्या ठिकाणी कार्यरत आहे, त्या ठिकाणी गठीत केलेल्या महिला तक्रार निवारण समितीसमोर सदर प्रकरणी सुनावणी देऊन चौकशी करुन दोन महिन्याच्या आंत अहवाल राज्य महिला तक्रार निवारण समितीस तसेच विभागांच्या सचिवांना सादर करावा. सचिवांनी त्यांचा अहवाल अभिप्रायासह एक महिन्याच्या आंत राज्य महिला तक्रार निवारण समितीसमोर सादर करावा.

८. राज्य महिला तक्रार निवारण समितीने सदर अहवालाचा अभ्यास करुन एक महिन्यात आढावा घ्यावा व संबंधितांस योग्य ते निर्देश देण्यात यावेत.

४. वरील कार्यपध्दतीचे व वेळेचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन तक्रारदार महिलेस वेळीच न्याय मिळू शकेल. संबंधित मंत्रालयीन विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे सूचना त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नांवाने,**

**( प्रणाली चिटणीस )**
अवर सचिव तथा सदस्य सचिव
राज्य महिला तक्रार निवारण समिती.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. विरोधी पक्ष नेता कार्यालय, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. महिलांचे हक्क व कल्याण समिती, विधानभवन, मुंबई.
७. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती)
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.

११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद / नागपूर.
१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारी, मुंबई / औरंगाबाद / नागपूर.
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६. विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
१७. सर्व जिल्हाधिकारी.
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१९. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२०. सर्व नगरपालिकांचे, नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी.
२१. सर्व शासकीय महामंडळ, संस्था, संचालक, सेवायोजन, मुंबई.
२२. सर्व मंत्रालयीन विभाग.
२३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२४. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई.
२६. व्यवस्थापकीय संचालक, मॅफको, मुंबई.
२७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
२८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र हौसिंग अँड एरिया डेव्हलपमेंट ॲथॉरिटी, मुंबई.
२९. व्यवस्थापकीय संचालक, एम.एस.आर.टी.सी., मुंबई.
३०. आयुक्त, एम.एम.आर.डी.ए., मुंबई.
३१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई.
३२. यवस्थापकीय संचालक, सिकॉम (SICOM) , मुंबई.
३३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, मुंबई.
३४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
३५. व्यवस्थापकीय संचालक, मेल्ट्रॉन, मुंबई.
३६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
३७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई.
३८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
३९. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन, मुंबई.
४०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कार्पोरेशन लि., मुंबई.
४१. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.
४२. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई.
४३. व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई.
४४. व्यवस्थापकीय संचालक, चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ, मुंबई.
४५. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक वि.जा.भ.ज. विकास महामंडळ, मुंबई.
४६. मुख्य प्रशासकीय, महा.स्टेट को.ऑ.कॉटन ग्रोवेअर्स मा.फे.लि., मुंबई.
४७. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट को.ऑ.मार्क.फेड.लि., मुंबई.
४८. व्यवस्थापकीय संचालक, महा.राज्य सहकारी दूध महासंघ मर्या., मुंबई.
४९. व्यवस्थापकीय संचालक, महा.राज्य खादी आणि ग्रामोद्योग विकास महामंडळ, मुंबई.
५०. व्यवस्थापकीय संचालक, महा.राज्य टेक्सटाईल कॉर्पोरेशन लि., मुंबई.
५१. व्यवस्थापकीय संचालक, महा.फिल्म स्टेज अँड कल्चरल डेव्ह.कॉर्पो.लि., मुंबई.
५२. व्यवस्थापकीय संचालक, डेव्हलपमेंट कॉर्पो.ऑफ कोकण भवन लि., मुंबई.
५३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.
५४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर.
५५. व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ, नागपूर.

५६. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट मायनिंग कार्पो.,लि. नागपूर.
५७. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट हॅण्डलूम कार्पो.लि., नागपूर.
५८. व्यवस्थापकीय संचालक, महा.एनर्जी डेव्ह.एजन्सी, पुणे.
५९. महासंचालक, यशदा, पुणे.
६०. व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे.
६१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेतकी विकास महामंडळ, पुणे.
६२. व्यवस्थापकीय संचालक, महा.शेळी व मेंढी विकास महामंडळ लि., पुणे.
६३. व्यवस्थापकीय संचालक, महा.जमीन विकास महामंडळ, पुणे.
६४. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट वेअरहौसिंग कार्पोरेशन लि., पुणे.
६५. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट सीड्स कार्पो. लि., अकोला.
६६. व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद.
६७. व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर.
६८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
६९. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्ह. कार्पो., पुणे.
७०. व्यवस्थापकीय संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
७१. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट लिट्रेचर अँड कल्चरल बोर्ड, मुंबई.
७२. व्यवस्थापकीय संचालक, महा.राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
७३. व्यवस्थापकीय संचालक, महा.स्टेट हॅण्डीकॅप फाय.अँड डेव्ह.कार्पो.लि., मुंबई.